**Course Structure: 2024-25**
**MARATHI (109)**
**Class-XII**

**Time:3 Hours** **Max. Marks:80**

## प्रस्तावना:

सर्वांगीण विकास' हे शिक्षणाचे मुख्य सूत्र आहे आणि 'भाषा शिक्षण' या शिक्षण प्रणालीचा आधारभूत कणा आहे, कारण जीवन आणि भाषा यांचा असलेला अतूट संबंध नाकारता येत नाही. शाश्वत जीवन मूल्ये आणि सांस्कृतिक, सामाजिक, व्यावसायिक, अशा वेगवेगळ्या क्षेत्रातील विविध मूल्ये व कौशल्ये रुजवणे केवळ भाषेमुळेच शक्य होते.

मराठी वा अन्य माध्यमातील विद्यार्थी निम्न माध्यमिक स्तर म्हणजे इयत्ता १० वीपर्यंत शिक्षण पूर्ण करतात तेव्हा मराठी वाचणे, ऐकणे, लिहणे, समजून घेणे, आपले मत / विचार व्यक्त करणे अशा सामान्य क्षमता मिळवतो. उच्च माध्यमिक स्तरावर [ ११ वी, १२ वी] या क्षमतांचाही स्तर उंचावणे अपेक्षित आहे. या टप्प्यावर विद्यार्थी 'उदर निर्वाहाची साधन-निश्चिती व त्यासाठी पुढील उच्च शिक्षणाची तयारी' यासाठी स्वत:ला तयार करत असतो.

यानुसार या पाठ्यक्रमातून मराठी साहित्यातील कथा, कविता, लेख यासोबतच व्यक्तिचित्र, विनोदी साहित्य, नाटक, प्रस्तावना लेखन अशा साहित्य प्रकारांची ओळख होऊन मराठी भाषेची, मराठी साहित्याची जाण समृद्ध होईल. शाश्वत नैतिक मूल्यांची जाणीव सखोल होईल, सुजाण नागरिकत्व, पर्यावरण मैत्री अशा मूल्यांचीही जाण विकसित होईल. 'व्यक्त करणे / अभिव्यक्त होणे' ही या काळच्या नव्या पिढीची आवड आणि गरज आहे. यासाठी वेगवेगळी भाषिक कौशल्ये रुजवली जातील. मागील वारशाची ओळख आणि विज्ञान, नवे तंत्रज्ञान याची सांगड घातली जाऊन व्यवहारात व नव्या युगातील व्यावसायिक, सामाजिक, सांस्कृतिक ..... अशा विविध क्षेत्रात भाषेचा सुयोग्य उपयोग करता यावा यासाठी भाषिक क्षमता विकसित होतील आणि विद्यार्थी नव्या युगाची आव्हाने पेलण्यास सक्षम होईल.

## उद्दिष्ट्ये:

मराठी भाषेतील / मराठी भाषेत .........

- आतापर्यंत प्राप्त केलेल्या भाषिक क्षमतांचा स्तर वाढवणे.
- दृक् व श्राव्य माध्यमातून मिळणाऱ्या सूचना, जाहिराती, निवेदने, बातम्या, चर्चा, परिसंवाद इत्यादीतील विचार / कल्पना समजणे.
- नाटक, काव्य अशा साहित्याचे अभिवचन करता येणे.
- विविध साहित्य प्रकारांचा आस्वाद घेणे.
- वाचनातून समीक्षणात्मक दृष्टीकोन निर्माण होणे व तो जोपासला जाणे.
- एखाद्या विषयाला अनुसरून स्वत:चे विचार, मत सुसूत्रपणे, संदर्भासह मांडता येणे. व्यक्त होता येणे.

- जनसंचार माध्यमांसाठी आवश्यक अशी भाषिक कौशल्ये आत्मसात करून उपयोग करता येणे. जसे : कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, रेडीओ निवेदन इ.
- नव्या युगातील नव्या माध्यामतून - प्रिंट व इलेक्ट्रानिक माध्यम - मराठी भाषेचा सुयोग्य वापर करता येणे.
- अनुभव, निरीक्षण आणि त्यावरील आपले विचार, लिखित रुपात व्यक्त करणे.
- अनुवाद कौशल्य मिळवणे.
- भाषेचा व्याकरण व लेखन नियमानुसार अचूक वापर करता येणे.
- भाषा सौंदर्याची जाण विकसित होऊन लालित्यपूर्ण सुंदर भाषेचा उपयोग करता येणे.

# अभ्यासक्रम इयत्ता : बारावी / मराठी (109) 2024-25

## CURRICULUM CLASS–XII / Marathi (109)

<u>अभ्यासक्रमाबाबत महत्त्वाचे</u> :

- प्रश्नपत्रिकेचे स्वरूप 80 गुण लेखी +20 गुण अंतर्गत मूल्यमापन असे आहे.
- तासिकांची संख्या ही कमी केली गेली आहे. त्यामुळे पाठ्यपुस्तकातील काही घटक/ पाठ वगळण्यात आले आहेत.
- तथापि विद्यार्थ्यांनी ते पाठ जरूर वाचावेत.

| **भाग 1 आणि 2 / Section 1 & 2** | | |
|---|---|---|
| अनुक्रम | पाठचे नाव **/** Name of the chapter | लेखक / कवी **/** Author |
| | बहु असोत सुंदर .. [फक्त वाचनासाठी ]<br>Bahu asot sundr .. [ only for reading] | श्री.कृ. कोल्हटकर<br>S. K. Kolhatkar |
| 1. | वेगवशता Vegvashta **(excluded)** | प्राचार्य शिवाजीराव भोसले<br>Prachary Shivajirao Bhosale |
| 2. | रोज मातीत [कविता] Roj Matit [poem] | कल्पना दुधाळ Kalpana Dudhal |
| 3. | आयुष्य ... आनंदाचा उत्सव Aayushy .. Aanandacha utsav | शिवराज गोर्ले Shivraj Gorle |
| 4. | रे थांब जरा आषाढ घना [ कविता]<br>Re Thyanb Jara Aashadh Ghana [Poem] | बा. भ. बोरकर B. B. Borkar |
| 5. | वीरांना सलामी Veeranna salami | अनुराधा प्रभुदेसाई<br>Anuradha Prabhudesai |
| 6. | रंग माझा वेगळा Rang Maza Vegala [poem] | सुरेश भट Suresh Bhat |
| 7. | विंचू चावला [ भारुड] Vinchu Chavla [Bharud] | संत एकनाथ Sant Eknaath |
| 8. | रेशीमबंध Reshimbandh | यू. म.पठाण Y. M. Pathan |
| 9. | समुद्र कोंडून पडलाय [कविता] **(वगळलेला)**<br>Samudra kondun Padalay [Poem]**(excluded)** | वसंत आबाजी डहाके A.B.Dahake |
| 10. | दंतकथा Dantkatha | वसंत सबनीस Vasant sabanis |
| 11. | आरशातील स्त्री Aarshatil Stri [Poem] | हिरा बनसोडे Hira Bansode |
| 12. | रंगरेषा व्यंगरेषा **(वगळलेला)**<br>Rang resha Yangresha (excluded) | मंगेश तेंडूलकर Mangesh Tendulkar |

| | | |
|---|---|---|
| **भाग 3 साहित्यप्रकार : कथा - परिचय** Drama : Type of literature - Introduction | | |
| 1. | शोध Shodh **(excluded)** | व. पु. काळे V. P. Kale |
| 2. | गढी Gadhi | प्रतिमा इंगोले Pratima Ingole |
| **भाग 4 : उपयोजित मराठी** Applied Marathi | | |
| 1. | मुलाखत Interview | |
| 2. | महितीपत्रक Brochure | |
| 3. | अहवाल Report | |
| 4. | वृत्तलेख Feature writing | |
| **भाग 5 : व्याकरण व लेखन** / Grammer & Writing skill | | |
| 1. | i] वाक्य प्रकार व वाक्य रुपांतर<br>Type of sentence : Identification & Transformation | |
| | ii] समास : अव्ययीभाव, तत्पुरुष, द्वंद्व [ओळखणे]<br>Identification of 'Samas' : Avyyibhav, Tatpurush, Dvandv | |
| | iii] प्रयोग : कर्तरी, कर्मणी, भावे<br>Voice : Kartari, Karmani, Bhave | |
| | iv] अलंकार **(वगळलेला)**<br>Alankar (excluded) | |
| 2. | निबंध लेखन : आत्मवृत्त, वर्णनात्मक, कल्पनात्मक, वैचारिक | |

मराठी युवकभारती : इयत्ता बारावी **[2020] Std – XII – 'Yuvak Bharti' (2020)**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळ, पुणे.

Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education, Pune

## प्रश्नपत्रिका प्रारूप इयत्ता : बारावी मराठी (109) 2024 - 25

**Question Paper Format CLASS–XII / Marathi (109) 2024 - 25**

एकूण गुण: 80

अंतर्गत मूल्यमापन: 20

### विभाग : अ ( गुण : 15)

| घटक | उपघटक | प्रश्न-प्रकार | प्रश्नसंख्या | गुण | एकूण तासिका |
|---|---|---|---|---|---|
| वाचन व आकलन | अपठीत गद्यांश [अंदाजे 250 /300 शब्दांचा] | बहुपर्यायी MCQ | 3 | 3 x 1 = 3 | 20 |
| | | लघूत्तरी SAQ | 2 | 2 x **2** = 4 | |
| | | लघूत्तरी SAQ | 1 | 1 x 3 = 3 | |
| | अपठीत पद्य | बहुपर्यायी MCQ | 2 | 2 x 1 = 2 | |
| | | लघूत्तरी SAQ | 3 | 3 x 1 = 3 | |

### विभाग ब ( गुण: 15 )

| घटक | उपघटक | प्रश्न-प्रकार | प्रश्नसंख्या | गुण | एकूण तासिका |
|---|---|---|---|---|---|
| लेखन | i) निबंध लेखन [आत्मवृत्त, वर्णनात्मक,सामाजिक विषयावर] | विस्तारात्मक उत्तर [300 / 325 शब्द ] [4 पैकी 1] | 1 | **1**x10 =10 | **30** |
| उपयोजित लेखन | क) माहिती पत्रक<br>ख) अहवाल<br>ग) वृत्तलेखन Feature writing | लघुउत्तरी SAQ [अंदाजे 60 / 70 शब्द] | 1 [2 पैकी 1] | 1x 5 = 5 | |

### विभाग क ( गुण:25)

| घटक | उपघटक | प्रश्न-प्रकार | प्रश्नसंख्या | गुण | एकूण तासिका |
|---|---|---|---|---|---|
| व्याकरण | i] समानार्थी / विरोधार्थी शब्द | लघूत्तरी SAQ | 3 | 3 x 1 = 3 | 60 |
| | ii]समास ओळखणे | लघूत्तरी SAQ / बहुपर्यायी MCQ | 2 [4 पैकी 2] | 2 x 2 = 4 | |
| | iii] वाक्याचे प्रयोग : [कर्तरी,कर्मणी,भावे] | लघूत्तरी SAQ / बहुपर्यायी MCQ | 3 [4 पैकी 3] | 3 x 2 = 6 | |
| | iv] वाक्य प्रकार : ओळखणे / परिवर्तन [विधानार्थी,प्रश्नार्थक,आज्ञार्थ] | बहुपर्यायी MCQ / लघुत्तरी SAQ | 3 [4 पैकी 3] | 3 x 2 = 6 | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | v] वाक्प्रचार: अर्थ किंवा उपयोग [पाठ्यपुस्तकाधारे] | बहुपर्यायी MCQ / लघुत्तरी SAQ | 3 [4 पैकी 3] | 3 x 2 = 6 | |
| **विभाग : ड ( गुण : 25 )** | | | | | |
| **घटक** | **उपघटक** | **प्रश्न-प्रकार** | **प्रश्नसंख्या** | **गुण** | **एकूण तासिका** |
| साहित्य (Lit) साहित्यप्रकार | i) गद्य पाठ ( prose) | बहुपर्यायी M.C.Q. | 2 | 2 x 1 = 2 | |
| | [30 / 40 शब्दांत उत्तरे ] | लघुत्तरी S.A.Q. | 2 [3 पैकी 2] | 2 x 2 = 4 | |
| | [70 / 75 शब्दांत उत्तरे ] | विस्तारात्मक उत्तरे (L.A.Q.) | 2 [3पैकी 2] | 2 x 3= 6 | |
| उपयोजित मराठी | [ 60 / 70 शब्दांत उत्तरे] | विस्तारात्मक उत्तरे (L.A.Q.) | 1 [2 पैकी 1] | 1 x 3 = 3 | 70 |
| | ii) पद्य पाठ (Poetry) | बहुपर्यायी M.C.Q. | 2 | 2 x 1= 2 | |
| | [30 / 40 शब्दांत उत्तरे ] | लघुत्तरी S.A.Q. | 2 [3 पैकी 2] | 2 x2 = 4 | |
| | ससंदर्भ आशय / भावार्थ स्पष्टीकरण | विस्तारात्मक उत्तरे (L.A.Q.) | 1 2 पैकी 1 ] | 1x 4 = 4 | |

* **अंतर्गत मूल्यमापन : 20 गुण Internal Assessments**

# मार्गदर्शनात्मक रूपरेषा :

| कौशल्ये | कृती / उपक्रम ( एकूण 20 गुणांसाठी) |
|---|---|
| भाषिक | मुलाखत घेणे / भाषण / परिचर्चा, कथा-कथन, परिसंवाद ..... इ. |
| वाचन | नाट्यवाचन, काव्य-वाचन, संवाद-प्रस्तुती .. इ. |
| लेखन | अहवाल / वृत्त / वृत्तलेखन / निबंध/ कथा/ काव्य/ नाट्य लेखन, जाहिरात, समीक्षण,.... इ. |
| सादरीकरण | गृहकार्य, भित्तीपत्रिका, माहितीपत्रिका, संगणकावर पीपीटी, संग्रह-कार्य .. इ. |

** *शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या कौशल्यांना आणि कृतिशीलता,सृजनशीलता, कल्पनात्मकता आदी गुणांना संधी मिळेल असे उपक्रम द्यावेत ही अपेक्षा आहे.*